## ६. * नगरविकास विभागाला नेमून दिलेले विषय.

* दिनांक २४ ऑगस्ट, १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे मूळ शीर्षकाऐवजी दाखल करण्यात आले.

**एक. नगरविकास विभाग.**

१. स्थानिक शासन म्हणजेच नागरी क्षेत्रातील स्थानिक स्वयंशासनाच्या प्रयोजनासाठी महानगरपालिका, नगरपालिका, पौरनगरपालिका, छावण्या व अधिसूचित क्षेत्र समित्या, सुधार विश्वस्त मंडळे, खनिकर्म वसाहत प्राधिकरणे यांची स्थापना व अधिकार (नागरी भागातील अग्निशमन दल सेवा यासह).

२. भारताबाहेरील तीर्थक्षेत्राखेरीज इतर ठिकाणची तीर्थक्षेत्रे (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २२-क पहा).

३. नागरी भागातील दफन व दफनभूमि, प्रेतदहन व दफनभूमी (तसेच सामान्य प्रशासन विभागाखालील नोंद क्रमांक १३ व ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक १६ पहा).

४. छावणी क्षेत्रातील स्थानिक स्वयंशासनाच्या भागातील व भारतामधील (भाडे नियंत्रणासह) निवास व्यवस्थेचे विनियमन करणे छावणी क्षेत्रातील अग्निशमन सेवा यासह अशा भागांचे परिसीमन करणे (छावणीतील न्यायिक अधिकाऱ्यांच्या नियुक्तीखेरीज).

५. गृह विभागाखालील अनुक्रमांक ४५-बी वरील नोंदीअनुसार तरतुद केलेली आहे त्याखेरीज इतर पांथगृहे व पांथगृहपाल.

६. प्रतिव्यक्तीकर, व्यवसाय कर, व्यापार, आजीविका व सेवायोजन, पशु व बोटींवरील कर, वर्तमानपत्रांमध्ये प्रसिध्द केलेल्या व त्यांनी स्थानिक नागरी प्राधिकरणाकडून जेवढा कर वसूल केला त्याव्यतिरिक्त जाहिरातीं- वरील वर्तमानपत्रांखेरीज मालाच्या खरेदी-विक्रीवरील कर (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक १८ व ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक १० पहा).

७. उपयोग, वापर किंवा विक्री यासाठी स्थानिक नागरी विभागात आणलेल्या मालाच्या प्रवेशावरील उपकर (तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक ११ पहा).

८. शहर नियोजन योजना.

९. विनिर्दिष्ट केले असेल त्याप्रमाणे नवीन वसाहतींच्या नागरी वृध्द केंद्राचे नियोजन व निष्पादन करणे आणि अशा केंद्राच्या विकासाचे काम सोपविलेली अभिकरणे.

१०. मुंबई महानगर प्रदेश विकास व तत्सम प्राधिकरणे.

१०-अ. *न्हावा शेवा बंदराकरिता पायाभूत सवलतींच्या तरतुदीसंबंधातील व त्याच्या विकासासंबंधातील बाबी (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक ३९ पहा).

* दिनांक १२ मे, १९८० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

११. शहर नियोजन व मूल्यनिर्धारण विभाग.

१२. दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

१३. दिनांक ९ नोव्हेंबर, १९९५ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

१४. दिनांक ३० एप्रिल, १९८५ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

१५. दिनांक १४ सप्टेंबर, १९८३ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे वगळण्यात आले.

१६. (स्थानिक नागरी स्वयंशासन संस्थांद्वारे आकारणी करण्यात येत असेल तेव्हा) जमिनी व इमारती यांवरील कर.

*नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम,१९७६ (१९७६ चा ३३) यामध्ये व्याख्या केलेल्या नागरी संकुलातील जमिनी व इमारती यावरील कर, व अशा जमिनींच्या वापरकर्त्यातील बदलासाठी

रुपांतरण अधिभाराची वसुली करणे (तसेच महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक ७ व २८ आणि ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक १२ व गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाखालील नोंद क्रमांक १८ पहा).

* दिनांक ३० जून, १९७६ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

१७. रेल्वे, समुद्र किंवा हवाई वाहतूक यांद्वारे केलेल्या मालांवरील किंवा प्रवाशांवरील सीमा कर, रेल्वे प्रवासभाडे व वाहतूक खर्च यांवरील कर (स्थानिक नागरी समित्यांशी जेव्हा संबंधित आहे तेवढा). (तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक १३ पहा).

१८. (ज्या ठिकाणी नगरपालिका समित्या आहेत) नागरी थंड हवेच्या ठिकाणांचे स्थानिक प्रशासन व तशा ठिकाणांवर अधीक्षकांच्या नियुक्त्यांचा समावेश आहे.

१९. ठाणे खाडीवरील पूल व मुंबई मार्ग विकास योजना यासंबंधातील बांधकामांखेरीज बृहनमुंबईचा विकास व त्यात अंतर्भूत असलेले पुनःप्रापण प्रकल्प*नागरी जमीन (कमाल मर्यादा व विनियमन) अधिनियम, १९७६ (१९७६ चा ३३) याअन्वये संपादन केलेल्या जमिनींचा विकास (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक १२ पहा).

* दिनांक ३० जून,१९७६ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

*१९-अ नागरी जमिनधारणा ( कमाल मर्यादा आणि नियमन) अधिनियम, १९७६ चा "जेथवर" इतर कोणत्याही विभागास नेमून दिलेल्या बाबींशी संबंध येतो त्याखेरीज (कृपया महसूल व वन विभागाखालील नोंद क्रमांक २ पहावा )

* दिनांक २३ ऑक्टोंबर , २००० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

२०. * महानगरपालिका व नगरपालिका यांच्या अधिकारितेखालील क्षेत्रातील गुरांचे कोंडवाडे यांचा अंतर्भाव असलेले कोंडवाडे व गुरांचा प्रतिबंध (तसेच गृह विभागाखालील नोंद क्रमांक २२-अ व ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक १६-अ पहा).

* दिनांक १२ ऑक्टोबर, १९८१ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

२०-अ. * महानगरपालिका व नगरपरिषदा यांच्या अधिकारितेखालील क्षेत्रांमध्ये जैव-वायुसयंत्रांच्या (बायो गॅस प्लन्ट) योजनांचे प्रशासन (तसेच ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक १६-ब पहा).

* दिनांक २४ मार्च, १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे दाखल करण्यात आला.

२०-ब. * नागरी क्षेत्रातील कत्तलखान्यांचे बांधकाम, परिक्षण व नियंत्रण (तसेच कृषि,पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाखालील नोंद क्रमांक ४१ व ग्रामविकास व जलसंधारण विभागाखालील नोंद क्रमांक ५ पहा).

दिनांक २० ऑगस्ट, १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

२०-क. * नगरपालिका ट्राममार्ग (तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक १४-अ व गृह विभागाखालील नोंद क्रमांक ३८ पहा).

* दिनांक १ सप्टेंबर,१९८४ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

२०-ड. * नागरी (नगरपालिका) सेवासंबंधातील, शहरांसाठी विशेष विकास कार्यक्रम.

२०-इ. * नगरपरिषदेच्या किंवा महानगरपालिकेच्या स्थानिक सीमांच्या आतील तीर्थयात्रेच्या स्थळांसाठी विशेष विकास कार्यक्रम.

* दिनांक २२ जून, १९९३ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

*२०-एफ नागरी परिवहन (नागरी परिवहन प्रकल्पासह) (तसेच गृह विभागाखालील नोंद क्र.३७ आणि सार्वजनिक बांधकाम विभागाखालील नोंद क्रमांक ९ पहा.)

*दिनांक ६ जुलै,२००० च्या शासकीय अधिसूचनेद्वारे समाविष्ट करण्यात आले.

**दोन. सर्वसाधारण.**

* दिनांक २४ ऑगस्ट, १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे नवीन क्रमांक देण्यात आला.

२१. * नगरविकास विभागाला नेमून दिलेल्या कोणत्याही विषयासंबंधातील हुकूमनाम्याची देय असलेली रक्कम निर्लेखित करणे.

* दिनांक २४ ऑगस्ट, १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे बदली दाखल करण्यात आले.

२२. * या सूचीतील कोणत्याही बाबींच्या प्रयोजनार्थ चौकशी व आकडेवारी.

२३. * या सूचीतील कोणत्याही बाबींसंबंधातील परंतु कोणत्याही न्यायालयात स्वीकारण्यात न झालेली फी. दिनांक २४ ऑगस्ट, १९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे नवीन क्रमांक देण्यात आला.

२४. * राज्याच्या प्रयोजनासाठी शासनाकडे विहित केलेली किंवा शासनाच्या ताब्यात असलेली आणि नगरविकास विभागाला नेमून दिलेली बांधकामे, जमिनी व इमारती.

* दिनांक २४ ऑगस्ट,१९८२ च्या शासकीय अधिसूचनेद्वारे बदली दाखल करण्यात आले.